# प्रेसनोट

दिनांक—३०/१०/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | पो.हे.कॉ. अब्दुल रहीम अब्दुल कदीर, वय ५४ वर्ष, ब.नं. २२, नेमणुक – पोलीस स्टेशन भातकुली, पोलीस आयुक्तालय अमरावती शहर, वर्ग – ३ रा. असुर्या पेट्रोलपंप मागे, जाकीर कॉलनी, अमरावती जिल्हा अमरावती |
| ३ | पडताळणी तारीख | दिनांक ११/०८/२०२५ |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | तडजोडअंती २०,०००/– रूपये |
| ६ | घटनास्थळ | पोलीस स्टेशन भातकुली, पोलीस आयुक्तालय अमरावती शहर, जि. अमरावती |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांचे विरूध्द तक्रार पोलीस स्टेशन भातकुली जि. अमरावती येथे अप.नं. १३७/२०२५ बी.एन.एस कलम १०८,२२९(३),३(५) गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान तपासी अधीकारी यांनी तक्रारदार यांचे भावाला अटक केली व तक्रारदार यांनी मा. न्यायालयातुन अटकपुर्व जामीन घेतलेला आहे. गुन्हयाचे तपासी अधिकारी यांनी तक्रारदार यास गुन्हयाच्या तपासात मदत करण्याकरीता व केस ढिल्ली बनवुन त्यामध्ये फायदा होईल, त्यासाठी तक्रारदाराकडे मला ५०,०००/– रूपयाची मागणी केली होती. तेव्हा १०,०००/– रू. तक्रारदारने तपासी अधिकारी यांना दिले होते. परंतु तक्रारदारास तपास अधिकारी यांनी मागणी केलेली उर्वरीत लाच रक्कम द्यायची नसल्याने त्यांनी दिनांक ११/०८/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अमरावती येथे तक्रार नोंदविली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/०८/२०२५ रोजी शासकीय पंचासमक्ष पोलीस स्टेशन भातकुली जि. अमरावती येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमाविली असता, आलोसे पो.हे.कॉ. अब्दुल रहीम अब्दुल कदीर यांनी तक्रारदार यांना तपास अधिकारी यांचेकडे तपासावर असलेल्या गुन्हयात मदत करण्याकरीता २०,०००/– रूपयाची लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमुद आलोसे विरूध्द पोलीस स्टेशन भातकुली, पोलीस आयुक्तालय अमरावती शहर, येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलमन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. सचिंद्र शिंदे अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. सुनिल किनगे, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती, श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण वेरूळकर पोलीस निरीक्षक, पोलीस हवा. डिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, पोअं. किशोर पवार, गोपाल किरडे आणि चालक पो.अंम. सलीम खान यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

**संपर्क :– १) मा.श्री. मारूती जगताप, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र**
**मो.क्र. ९८५०४८८७८८**
**२) मा.श्री. सचिद्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र**
**मो.क्र. ९७६४२१०४८५**
**३) मा.श्री. सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती**
**मो.क्र. ९८२३१११११५५, ७५१७५७१०६४**
**४) मा.श्री. मिलींद अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला**
**मो.क्र. ९१८५८२२६७६**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती, ऑफीस फोन नं. ०७२१– २५५२३५५,**
**मो. क्र. ७०२०६९३४८१, टोल फ्री. क्रमाक – १०६४**

३०/१०/२५
(प्रविण वेरूळकर)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अकोला